RNI No. MAHBIL /2009/31747

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ८, अंक २०] सोमवार, नोव्हेंबर २१, २०२२/ कार्तिक ३०, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ३०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील**
**(भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त)**
**अधिसूचना, आदेश व निवाडे.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २१ नोव्हेंबर २०२२

**अधिसूचना**

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ-२०१९/प्र.क्र.५३/काम-७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील " **अभियांत्रिकी उद्योगातील कामधंदा** " या अनुसूचित रोजगारात असलेल्या (यात यापुढे ज्याचा " उक्त अनुसूचित रोजगार " असा उल्लेख करण्यात आलेला आहे) कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक. किवेअ-१०१३/४३०/प्र.क्र.२०५/काम-७, दिनांक ३ मार्च, २०१४ अन्वये पुनर्निर्धारित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करुन उक्त अनूसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, आता, किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) लागू करताना त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक किवेअ-२०१९/प्र.क्र.५३/ कामगार-७, दिनांक ४ जुलै, २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर पुनर्निर्धारित करीत आहे :—

## अनुसूची

| अ. क्र. | कामगारांची वर्गवारी | मूळ किमान वेतन दर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | | |
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
| १ | कुशल | १६,४५० | १६,०४५ | १५,२२५ |
| २ | अर्धकुशल | १५,०२५ | १४,६२० | १३,८०५ |
| ३ | अकुशल | १४,०१० | १३,६०५ | १२,७९५ |

**स्पष्टीकरण.**—या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ—

*ए* परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्र तसेच महानगरपालिकांच्या क्षेत्रापासूनचे २० किलोमीटर पर्यंतचे औद्योगिक क्षेत्र ;

*बी* परिमंडळ २ - महाराष्ट्र राज्यातील अ, ब व क वर्ग नगरपालिका/ नगरपरिषद क्षेत्र, तसेच छावणी क्षेत्र ;

*सी* परिमंडळ ३ - परिमंडळ १ व २ मध्ये दर्शविलेले क्षेत्र वगळून उर्वरित सर्व क्षेत्र ;

*डी* रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजूरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजूरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशांपर्यंत पूर्णांकात करुन काढण्यात येईल ;

*इ* अर्धवेळ काम करणाऱ्या कामगारांना देय असलेल्या प्रति तास किमान वेतनाचा दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास ८ तासाने भागून व त्यात १५% (पंधरा टक्के) वाढ करुन तसेच येणारी रक्कम नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात परिवर्तित करण्यात येऊन काढण्यात येईल;

*एफ* किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल;

*जी* किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास त्याचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा समावेश असेल;

*एच* कुशल कामगार म्हणजे जो स्वत:च्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार एखादा पाडू शकतो असा कामगार;

*आय* अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरुपाचे असे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्य रितीने पार पाडण्याची आवश्यकता असते, मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते;

*जे* अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तूंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील ११ केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका २००१=१००) हा उक्त अनुसूचीत रोजगारात नोकरी करत असलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी १ जानेवारी व १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यासाठी उक्त कामगारांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढील आणि ३९८ निर्देशांकावर अशा प्रत्येक सरासरीची वाढ निश्चित करुन अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यांलगत

पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निर्देश करण्यात आला आहे) सर्व परिमंडळाच्या संबंधित दरमहा रुपये ३१ या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्त प्रमाणे हिशोब करुन काढलेला राहणीमान भत्ता, जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जुलै ते डिसेंबर या कालावधीमधील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जाहीर करील :

परंतु, सक्षम प्राधिकारी किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंतच्या किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दा. सो. खताळ,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 21st November, 2022.

*NOTIFICATION*

MINIMUM WAGES ACT, 1948.

No. MWA-2019/CR.53/LAB-7.—Whereas, by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. MWA-1013/430/CR--205/LAB-7, dated the 3rd March, 2014 the Government of Maharashtra has revised the minimum rates of wages payable to the employees employed in the scheduled employment, *viz.,*"Employment in Engineering Industry" (hereinafter referred to as "the said scheduled employment") in the State of Maharashtra ;

And whereas, the Government of Maharashtra, having reviewed the minimum rates of wages payable to the employees employed in the said scheduled employment, considers it necessary to revise them further ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section *(1)* of section 3 read with sub-section *(2)* of section 5 of the Minimum Wages Act, 1948 (11 of 1948), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra, after considering all the representations received by it in respect of the proposal published in Government Notification, Industries, Energy and Labour Department No. MWA-2019/CR-53/LAB-7, dated the 4th July, 2019 and after consulting the Advisory Board, hereby revises, with effect from 21st November, 2022, the basic minimum rates of wages payable to the employees employed in the said scheduled employment and refixes them, as set out in column (3) of the Schedule appended hereto, as the basic minimum rates of wages payable to the class of employees mentioned against them in column (2) of the said Schedule.

***SCHEDULE***

| Serial No. | Class of Employees | Basic Minimum rates of wages (basic rates per month in rupees ) | | |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | | |
| | | Zone I | Zone II | Zone III |
| 1. | Skilled | 16,450 | 16,045 | 15,225 |
| 2. | Semi-skilled | 15,025 | 14,620 | 13,805 |
| 3. | Unskilled | 14,010 | 13,605 | 12,795 |

*Explanation.*— For the purposes of this notification,—

*(a)* *Zone I.*—It shall comprise of the areas falling within the limits of all Municipal Corporations areas, and Industrial areas within 20 Kilometers radius from all Municipal Corporations limits;

*(b)* *Zone II.*—It shall comprise of the areas falling within the limits of all "A", "B" and "C" class Municipal Councils and Cantonment areas;

*(c)* *Zone III.*—It shall comprise of the all other areas in the state not included in Zone-I and Zone-II.

*(d)* the minimum rates of daily wages payable to an employee employed on daily wages shall be computed by dividing the minimum rates of monthly wages fixed for the class of employees to which he belongs by twenty-six, the quotient being stepped up to the nearest *paisa;*

*(e)* the minimum rates of hourly wages payable to part-time employee shall be computed by dividing the daily rates of minimum wages applicable to the concerned class of employees by eight (hours) with fifteen per cent. rise in it and quotient being stepped up to the nearest *paisa;*

*(f)* the minimum rates of wages shall be inclusive of payment of remuneration in respect of weekly day of rest;

*(g)* the minimum rates of wages shall consist of basic rates, the Cost of Living Allowance and the cash value of concession, if any;

*(h)* a skilled employee is one who is capable of working efficiently, of exercising considerable independent judgment and of discharging his duties responsibly;

*(i)* a semi-skilled employee is one who does work generally of a well-defined routine nature wherein the major requirement is not so much of the judgment, skills and dexterity but of proper discharge of duties assigned to him for a relatively narrow job and important decisions are made by others. his work is, thus, limited to the performance of routine operation of limited scope;

*(j)* an unskilled employee is one who does operations that involve the performance of simple duties which require exercise of little or no independent judgment or previous experience, although, a familiarity with the occupational environment is necessary; his work may, thus, require in addition to physical exertion, familiarity with a variety of articles or goods.

**APPENDIX**

1. The average Consumer Price Index Number in respect of eleven centers in the State of Maharashtra for working class (New Series 2001=100) shall be the Cost of Living Index Number applicable to the employees employed in the said scheduled employment. The Competent Authority appointed by the Government shall, after the expiry of every six months commencing on the first day of January and the first day of July, calculate the average of the Cost of Living Index Number applicable to the said employees for these six months and, ascertain the rise of such average over 398 points. For such rise of every point, special allowance (hereinafter referred to as "the Cost of Living Allowance") payable to the employee in the said scheduled employment for each of the six months immediately following six months in respect of which such average has been calculated at the rate of Rs. 31.00 per month in respect of all *Zones*.

2. The Cost of Living Allowance computed as aforesaid shall be declared by the Competent Authority by notification in the *Official Gazette* in the last week of July when such allowance is payable for each of the months from July to December and in the last week of January when such allowance is payable for each of the months from January to June :

Provided that, the Competent Authority shall declare the Cost of Living Allowance payable in respect of the period from the date of fixation of the rate of minimum wages to the end of December or June, as the case may be, immediately after the said date with effect from which the minimum rates of wages are fixed.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. S. KHATAL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**संदर्भ क्र.सुरमं**/अध्यक्ष/२०२३-२४६७
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई - ४०० ७०५.
दूरध्वनी क्र : ०२२-३५२५२३४६/३४७/३४८/३४९/३५०

दिनांक : १६ मे, २०२३

# आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे वेतन व भत्त्यांमध्ये दि.१ मे. २०२३ पासून सुधारणा करणेबाबत.**

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते निश्चित करण्याबाबत, खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मधील तरतुदीनुसार मंडळास अधिकार प्रदान करण्यांत आले आहेत. सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यासाठी मंडळाने किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत "दुकाने व व्यापारी आस्थापना" मधील कामगारांना लागू असलेले किमान वेतनाचे दर हे आधारभूत प्रमाण मानण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार सदर अनुसूचित उद्योगधंद्यामधील कामगारांसाठी शासनातर्फे वेळोवेळी जाहीर होणारा विशेष भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना अदा करण्यांत येतो. त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेल्या मागणीनुसार सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वेळोवेळी वाढ करण्यांत आलेली आहे. मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे सध्याचे एकूण वेतन रु.२०,९३१.०० इतके आहे.

मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ करणेसाठी विविध सुरक्षा रक्षक संघटनांनी निवेदनाद्वारे केलेल्या मागणीसंदर्भात, मंडळाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० चे उपखंड (२) मधील तरतुदीनुसार, मंडळाने दि.३.१२.२०२० रोजी लोकसत्ता, मुंबई सकाळ, इंडीयन एक्स्प्रेस, पुढारी या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करुन सुरक्षा रक्षकांची प्रस्तावित वेतनवाढ जाहीर केलेली होती व सदर जाहीर सूचनेद्वारे बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा कार्यक्षेत्रामधील मुख्य मालकांच्या विविध संघटना/असोसिएशन्स व सुरक्षा रक्षक आणि त्यांच्या कामगार संघटना यांना सदर जाहीर सूचनेमधील प्रस्तवित केलेल्या वेतनवाढीबाबत आपल्या काही सूचना व हरकती असल्यास मंडळास सात दिवसांच्या आत सादर करण्याचे आवाहन करण्यांत आले होते.

मुख्य मालक/प्रमुख नियोक्ता व सुरक्षा रक्षक संघटना यांनी मंडळास प्रस्तावित केलेल्या वेतनवाढीच्या अनुषंगाने मंडळास प्राप्त झालेल्या सूचना व हरकती विचारात घेऊन दि. ८.०६.२०२२ रोजीच्या शासनाच्या निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीने दि. २२.०९.२०२२ रोजी वेतनवाढ प्रस्तावित केली होती.

सदर प्रस्तावास अनुसरुन शासनाने मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्याच्या वाढीबाबत मंडळास शासन पत्र क्र.सुरक्षा/वेतनवाढप्रस्ताव/२०२३/कार्या.-१४-१६३,दि.०९.०५.२०२३ अन्वये निर्देशित करण्यांत आले आहे की, सुरक्षा रक्षकांच्या माहे मे २०२३ पासूनच्या वेतनवाढीबाबत महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ व खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ च्या तरतुदीनुसार व यासंदर्भातील सर्व कायद्यानुसार व विषयानुसार काटेकोरपणे कारवाई करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत मंडळाने दि. १६.०५.२०२३ रोजी

......२

एकसदस्यीय मंडळामध्ये ठरावाद्वारे निर्णय घेतला असून सुधारीत वेतन व भत्ते **१ मे, २०२३ पासून पुढील तीन वर्षाकरीता** खालीलप्रमाणे निश्चित करण्यांत आलेले आहेत.

**१) मूळ वेतन :**

| अनु.क्र. | हुद्दा | सुधारीत मूळ वेतनाचे दर |
|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक | रु.१३,४५७.०० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | रु.१३,७३२.०० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | रु.१४,४३२.०० |
| ४. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | रु.१४,६५७.०० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | रु.१५,१०७.०० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | रु.१५,५५७.०० |

सदरचे दर दि.१ मे, २०२३ पासून सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्हा या मंडळाच्या कार्यक्षेत्रात लागू असतील.

**२) विशेष भत्ता (महागाई भत्ता) :** मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील "दुकाने व व्यापारी संस्था" अनुसूचित रोजगारासाठी लागू असलेला महागाई भत्ता लागू राहील.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र. ग्रा.वि/कि.वे.अ./विभ/२०२३(१)/कार्या-१०, दि. १.२.२०२३, अन्वये दि. १ जानेवारी, २०२३ ते दि. ३० जून, २०२३ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु. २,४४४.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. १.०२.२०२३ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. १ जानेवारी, २०२३ ते दि. ३० जून, २०२३ या कालावधीकरीतां. रु. २,४४४.०० दरमहा इतका केलेला आहे.

**३) घरभाडे भत्ता :** उपरोक्त किमान वेतनाशिवाय (मूळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता मिळून) मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकाऱ्यांना त्यांचे किमान वेतनावर २०% दराने दरमहा घरभाडे भत्ता प्रचलित पध्दतीनुसार देय राहील.

**४)** सुरक्षा रक्षकांना निश्चित केलेले वेतन व भत्ते हे ८ तासांच्या कामासाठी असून अतिकालीन कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

**५)** सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांच्या प्रवास भत्ता, धुलाई भत्ता व रजाकालिन प्रवास भत्त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**६)** लेव्हीच्या दरात अथवा संरचनेत कोणताही बदल केलेला नसून लेव्हीचे दर पुर्वीप्रमाणेच राहतील. त्याचप्रमाणे, सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता) ४५.२५ टक्के दराने लेव्ही आणि घरभाडे भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीन कामाचे वेतन यावर ३.२५ टक्के लेव्ही देय राहील.

......३

## सुरक्षा रक्षकांना दि.१ मे, २०२३ पासून लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.२५ %) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, रजाकालीन प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ महिला सु.रक्षक | १३,४५७.०० | २,४४४.०० | ३,१८०.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २२,५८१.०० | ७,१९५.०० | १०७.०० | २९,८८३.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १३,७३२.०० | २,४४४.०० | ३,२३५.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २२,९११.०० | ७,३२०.०० | १०८.०० | ३०,३३९.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४,४३२.०० | २,४४४.०० | ३,३७५.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,७५१.०० | ७,६३६.०० | ११३.०० | ३१,५००.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | १४,६५७.०० | २,४४४.०० | ३,४२०.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,०२१.०० | ७,७३८.०० | ११४.०० | ३१,८७३.०० |
| ५ | सुरक्षा अधिकारी | १५,१०७.०० | २,४४४.०० | ३,५१०.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,५६१.०० | ७,९४२.०० | ११७.०० | ३२,६२०.०० |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५,५५७.०० | २,४४४.०० | ३,६००.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,१०१.०० | ८,१४५.०० | १२०.०० | ३३,३६६.०० |

*** किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता**

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार १ मे, २०२३ पासून सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

(अशोक ल. डोके)
**कामगार उप आयुक्त** व
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
**प्रति,**
**मे. ................................................, नों.क्र. ........., युनिट क्र. .........**
**....................................................................**

*Z/Desktop/WGREVNOTICE 1 June 17 in Mar & Eng pg1

RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ९, अंक २३] बुधवार, जून ७, २०२३/ज्येष्ठ १७, शके १९४५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ३४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जून, २०२३.

**अधिसूचना**

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ-२०१९/प्र.क्र.५७/काम-७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील "**रस्ते तयार करणे किंवा त्याची देखभाल करणे किंवा बांधकामासंबंधीचा कामधंदा** " या अनुसूचित रोजगारात असलेल्या (यात यापुढे ज्याचा "उक्त अनुसूचित रोजगार" असा उल्लेख करण्यात आलेला आहे) कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक. किवेअ-१०१३/४३२/ प्र.क्र.२०७/ काम-७, दिनांक ३ मार्च, २०१४ अन्वये पुनर्निर्धारित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करून उक्त अनूसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे;

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम १९४८ (१९४८ चा ११) लागू करताना त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (*१*) चा खंड (*ब*) आणि कलम ५ च्या पोट-कलम (*२*) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक किवेअ-२०१९/प्र.क्र.५७/ कामगार-७, दिनांक ४ जुलै, २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक ७ जून, २०२३ पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनूसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर पुनर्निर्धारित करीत आहे :—

## अनुसूची

| अ.क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | मूळ किमान वेतन दर ( दरमहा रुपये ) (३) | | |
|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
| १ | कुशल | २१,८६० | २०,९९० | २०,१२५ |
| २ | अर्धकुशल | २०,३४५ | १९,४७५ | १८,६१० |
| ३ | अकुशल | १९,२६५ | १८,४०० | १७,५३० |

**स्पष्टीकरण–** या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ—

(ए) परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्र ;

(बी) परिमंडळ २ - महाराष्ट्र राज्यातील अ, ब व क वर्ग नगरपालिका/ नगरपरिषदांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्र/छावणी क्षेत्र ;

(सी) परिमंडळ ३ - परिमंडळ १ व २ मध्ये दर्शविलेले क्षेत्र वगळून उर्वरित सर्व क्षेत्र ;

(डी) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजूरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजूरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशांपर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल ;

(इ) अर्धवेळ काम करणाऱ्या कामगारांना देय असलेल्या प्रति तास किमान वेतनाचा दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास ८ तासाने भागून व त्यात १५% ( पंधरा टक्के ) वाढ करून तसेच येणारी रक्कम नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात परिवर्तित करण्यात येऊन काढण्यात येईल ;

(एफ) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल ;

(जी) किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास त्याचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा समावेश असेल ;

(एच) कुशल कामगार म्हणजे जो स्वतःच्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार एखादा पाडू शकतो असा कामगार ;

(आय) अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरुपाचे असे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की,ज्यामध्ये महत्त्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्य रितीने पार पाडण्याची आवश्यकता असते, मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते ;

(जे) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळया वस्तूंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील ११ केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका २००१=१००) हा उक्त अनुसूचीत रोजगारात नोकरी करत असलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी १ जानेवारी व १ जुलै रोजी सुरु होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यासाठी उक्त कामगारांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढील आणि ४१० निर्देशांकावर अशा प्रत्येक सरासरीची वाढ निश्चित करून अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यांलगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा "राहणीमान भत्ता" असा निर्देश करण्यात आला आहे) सर्व परिमंडळाच्या संबंधित दरमहा रुपये ४१ या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्त प्रमाणे हिशोब करून काढलेला राहणीमान भत्ता, जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये आणि जुलै ते डिसेंबर या कालावधीमधील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये जाहीर करील :

परंतु, सक्षम प्राधिकारी किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंतच्या किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिपक पोकळे,**
शासनाचे उप सचिव.

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, No. MWA-2019/CR-57/Lab-7 dated 07 June, 2023 published in the *Maharashtra Government Gazette*, Part I-L, Extra Ordinary is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK POKALE,
Deputy Secretary to Government.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mantralaya Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 7th June, 2023.

*NOTIFICATION*

MINIMUM WAGES ACT, 1948.

No. MWA.2019/CR-57/Lab-7.—Whereas, by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. MWA.1013/432/CR-207/LAB-7, dated the 3rd March 2014, the Government of Maharashtra has revised the minimum rates of wages payable to the employees employed in the scheduled employment, *viz.*,"Employment in the construction or maintenance of roads or in building operations " (hereinafter referred to as "the said scheduled employment") in the State of Maharashtra ;

And whereas, the Government of Maharashtra, having revised the minimum rates of wages payable to the employees employed in the said scheduled employment, considers it necessary to revise them further ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 3 read with sub-section (*2*) of section 5 of the Minimum Wages Act, 1948 (11 of 1948), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra, after considering all the representations received by it in respect of the proposal published in the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. MWA-2019/CR-57/LAB-7, dated the 4th July 2019 and after consulting the Advisory Board, hereby revises, with effect from 7th June, 2023 , the basic minimum rates of wages payable to the employees employed in the said scheduled employment and refixes them, as set out in column (3) of the Schedule appended hereto, as the basic minimum rates of wages payable to the class of employees mentioned against them in column (2) of the said Schedule.

*Schedule*

| Serial No. | Class of Employees | Basic Minimum rates of wages (basic rates per month in rupees ) | | |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | | |
| | | Zone I | Zone II | Zone III |
| 1 | Skilled | 21,860 | 20,990 | 20,125 |
| 2 | Semi-skilled | 20,345 | 19,475 | 18,610 |
| 3 | Unskilled | 19,265 | 18,400 | 17,530 |

*Explanation*—For the purposes of this notification,—

(*a*) *Zone I*.–It shall comprise of the areas falling within the limits of all the Municipal Corporations ;

(*b*) *Zone II*.–It shall comprise of the areas falling within the limits of all "A", "B" and "C" class Municipal Councils and Camtonment areas ;

(*c*) *Zone III*–It shall comprise of the all other areas in the State which are not included in Zone-I and Zone-II ;

(*d*) the minimum rates of daily wages payable to an employee employed on daily wages shall be computed by dividing the minimum rates of monthly wages fixed for the class of employees to which he belongs by twenty-six, the quotient being stepped up to the nearest *paisa* ;

(*e*) the minimum rates of hourly wages payable to part-time employee shall be computed by dividing the daily rates of minimum wages applicable to the concerned class of employees by eight (hours) with fifteen percent. rise in it and quotient being stepped up to the nearest *paisa* ;

(*f*) the minimum rates of wages shall be inclusive of payment of remuneration in respect of weekly day of rest ;

(*g*) the minimum rates of wages shall consist of basic rates, the Cost of Living Allowance and the cash value of concession, if any ;

(*h*) a skilled employee is one who is capable of working efficiently, of exercising considerable independent judgment and of discharging his duties responsibly ;

(*i*) a semi-skilled employee is one who does work generally of a well-defined routine nature wherein the major requirement is not so much of the judgment, skills and dexterity but of proper discharge of duties assigned to him for a relatively narrow job and important decisions are made by others ; his work is, thus, limited to the performance of routine operation of limited scope ;

(*j*) an unskilled employee is one who does operations that involve the performance of simple duties which require exercise of little or no independent judgment or previous experience, although, a familiarity with the occupational environment is necessary ; his work may, thus, require in addition to physical exertion, familiarity with a variety of articles or goods.

## *APPENDIX*

1. The average Consumer Price Index Number in respect of Eleven centers in the State of Maharashtra for working class (New Series 2001=100) shall be the Cost of Living Index Number applicable to the employees employed in the said scheduled employment. The Competent Authority appointed by the Government shall, after the expiry of every six months commencing on the first day of January and the first day of July, calculate the average of the Cost of Living Index Number applicable to the said employees for these six months and, ascertain the rise of such average over 410 points. For such rise of every point, special allowance (hereinafter referred to as "the Cost of Living Allowance") payable to the employee in the said scheduled employment for each of the six months immediately following six months in respect of which such average has been calculated at the rate of Rs. 41.00 per month in respect of all *Zones*.

2. The Cost of Living Allowance computed as aforesaid shall be declared by the Competent Authority by notification in the *Official Gazette* in the last week of July when such allowance is payable for each of the months from July to December and in the last week of January when such allowance is payable for each of the months from January to June :

Provided that, the Competent Authority shall declare the Cost of Living Allowance payable in respect of the period from the date of fixation of the rate of minimum wages to the end of December or June, as the case may be, immediately after the said date with effect from which the minimum rates of wages are fixed.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK POKALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.